सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

**माझगांव कार्यालय**

विक्रीकर भवन, ९ वा मजला,रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई ४००२०३ ☎ २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 ☎ 23742191 Fax : 23781061

**ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट – www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**

**पोलीस उपनिरीक्षक (पूर्व) परीक्षा -२०११ क्रमांक १४४२(१)(१)/२०११/तीन**

**जाहिरात क्रमांक : ७१/२०११**

**आयोगातर्फे पोलीस उप निरीक्षक (पूर्व) परीक्षा-२०११ रविवार दिनांक २६ जून, २०११ रोजी** महाराष्ट्रातील विविध **३५ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदाचे नाव व एकूण पदसंख्या** | **अराखीव** | **अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित** | **अनुसूचित जमाती** | **वि.जा. (अ)** | **भ.ज.(ब)** | **वि.मा.प्र.** | **भ.ज.(क)** | **भ.ज.(ड)** | **इ.मा.व.** |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| **१** | **पोलीस उप निरीक्षक** (एकूण १२१२ पदे) | ९५७ | ७८ | ६६ | ३ | ७ | १६ | १ | ४ | ८० |
| | महिला - | २८७ | २३ | २० | १ | २ | ५ | -- | १ | २४ |
| | खेळाडू - | ४८ | ४ | ४ | -- | -- | १ | -- | -- | ४ |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** महिलांसाठी व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

**२.३** महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**२.४ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.**

**३. वेतनश्रेणी :- रु. ९,३००-३४,८००(ग्रेड पे- ४,३००) अधिक भत्ते एकूण वित्तलब्धी अंदाजे रु. २१,७५२/-**

**४. पात्रतेच्या अटी :-**

**४.१ भारतीय नागरिक.**

**४.२ वयोमर्यादा - १ सप्टेंबर, २०११** रोजी किमान **१९ वर्षे** असावे व **२८ वर्षापेक्षा** (मागासवर्गाकरिता **३१ वर्षापेक्षा**) जास्त नसावे.

**४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-**

**४.३.१** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता **३ वर्षांपर्यंत** शिथिलक्षम राहील.

**४.३.२** पात्र खेळाडूंच्या बाबतीत **५ वर्षांपर्यंत.**

**४.३.३** पोलीस उपनिरीक्षक हे पद शासनाने गट-ब (अराजपत्रित) संवर्गात समाविष्ट केली असल्यामुळे सदर पदांसाठी शासनाने माजी सैनिकांसाठी आरक्षण विहित केलेले नाही. माजी सैनिकांच्या आरक्षणासंदर्भात उच्च न्यायलयात प्रकरण प्रलंबित आहे.

**४.३.४** माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम र ाहील.

**४.३.५ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल केली जाईल.**

**४.४ शैक्षणिक अर्हता :-**

**४.४.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

**४.४.२** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**४.४.३** जे उमेदवार पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसले आहेत असे उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा-२०११ करिता अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा- २०११ चा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**४.४.४** ज्या पदवीसाठी अंतर्वासिता (INTERNSHIP) निर्धारित केली असेल अशी पदवी धारण करणा-या उमेदवारांनी अंतर्वासिता मुख्य परीक्षेसाठी अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी पूर्ण केली असेल तरच त्याला पदवीधर समजण्यात येईल.

**४.५ शारीरिक पात्रता :-**

**४.५.१ पुरुषांसाठी : -** उंची १६५ से.मी. (अनवाणी) छाती किमान ७९ सें.मी. आणि फुगवून ८४ से.मी. (विस्तार ५ से.मी.)

**४.५.२ महिलांसाठी** :- उंची १५७ सें.मी. (अनवाणी)

**५. अपंग आरक्षणाबाबत :-** अपंग उमेदवार पात्र नाहीत.

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना "** तसेच **" परीक्षा "** या विभागातील "पोलीस उपनिरीक्षक परीक्षा" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**७.** पोलीस उपनिरीक्षक पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षेचा सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**८.** प्रस्तुत पदांना शासनाने दि. ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०" लागू आहे.

**९. प्रस्तत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवाराना शासनातर्फे दोन टप्प्यात प्रशिक्षणासाठी पाठविण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास सदर उमेदवारांची सेवाजेष्ठता शासनाच्या सेवाविषयक नियमानुसार निश्चित केली जाईल आणि त्यासंदर्भातील शासनाचा निर्णय हा अंतिम असेल.**

**१०. शुल्क :**

**१०.१** अमागास -रु. **२६०/-** १०.२ मागासवर्गीय - रु. **१३५/-**

**१०.३** सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

**१०.४** महाराष्ट्रातील भारतीय स्टेट बँकांच्या शाखांची यादी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**११. अर्ज करण्याची पद्धत :-**

**११.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत..

**११.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १६ मे,२०११ ते ६जून,२०११ या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.**

**११.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**११.४** विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्ण कार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

**११.५** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वत:चा ई मेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वत:ची स्वाक्षरी व स्वत:चा फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

**११.६** उमेदवारांनी आयोगाच्या www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) केल्यानंतर Apply Exam / Post या बटणावर क्लिक करावे. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक (पूर्व ) परीक्षा - २०११ वर Apply केल्यावर उमेदवारास त्याच्या पसंतीचे परीक्षा केंद्र निवडावे लागेल. परीक्षा केंद्राची यादी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. परीक्षा केंद्र निवडल्यानंतर तसेच दिनांक व ठिकाण नमूद केल्यावर Submit to MPSC वर क्लिक करुन आयोगास माहिती सादर करावी.

**११.७** वरीलप्रमाणे आयोगास माहिती सादर केल्यानंतर विहित परीक्षा शुल्काचा भरणा करण्यासाठी Print Challan या बटनावर क्लिक करावे व चलनाची प्रत घ्यावी. सदर चलनावर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक परीक्षा शुल्क चलनासह भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत रोखपालाकडे सादर करावे व बँकेकडून त्याच वेळी चलनाची प्रत घ्यावी.

**११.८** बँकेमध्ये विहित परीक्षा शुल्काचा चलनाद्वारे भरणा केल्यानंतर चलनावर प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद खालीलप्रमाणे करावी :-

**(१)** बँकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर स्वत:च्या युजर आयडी व पासवर्डद्वारे प्रवेश (Login) करुन Apply Exam/Post या बटणावर क्लिक करावे व Update Transaction ID या बटणावर क्लिक करुन बँकेकडून प्राप्त झालेला Transaction ID अचूकपणे नोंदवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ची नोंद अचूकपणे करण्यात आली असेल तरच उमेदवार परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरेल व पुढील प्रक्रिया करता येईल. अन्यथा पुढील कोणतीही कार्यवाही होऊ शकणार नाही.

**(२)** Transaction ID ची नोंद अचूकपणे केल्यानंतर व नोंदविलेला Trasaction ID वैध असल्यास उमेदवाराला संबंधित जिल्हाकेंद्रावरील आयोगाने निश्चित केलेले उपकेंद्र निवडावे लागेल. उपकेंद्र निवडल्यानंतर उमेदवारास त्याच्या प्रवेशप्रमाणपत्राची प्रत प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, त्याच्या नोंदणीकृत ई-मेल वर प्रवेशपत्र प्राप्त होईल. सदर प्रवेशपत्राची प्रत घ्यावी.

**(३)** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**(४)** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी अर्जाची प्रत प्रमाणपत्राच्या प्रती किंवा शपथपत्र आयोगाकडे स्वतंत्रपणे पाठविण्याची आवश्यकता नाही.

**१२.** विहित पद्धतीने अर्ज भरुन परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ६ जून, २०११** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ७ जून, २०११** पर्यंत बॅकेच्या क ार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

**१३.** चलनाद्वारे शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये भरल्यानंतर प्राप्त होणारा Transaction ID **दिनांक ९ जून, २०११ रोजी २३.५९** वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१४.** आयोगाने विहित केलेल्या पद्धतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पद्धतीने व विहित कालावधीत न करणाऱ्या उमेदवाराचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

**१५.** प्रस्तुत जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व www.mpsconline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

मुंबई :
दिनांक : **५ मे, २०११**

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग